तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.
तार — EDUTECH E-mail : desk16@dtemaharashtra.gov.in Internet :http/www.dte.org.in

क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०१७/८१
दिनांक : २०.५.२०१७

प्रति,
१) सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

२) सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

**विषय :शासकीय/निमशासकीय कार्यालये (विभागीय/जिल्हा व तालुका स्तर) शासन संचालित शैक्षणिक संस्थांमध्ये कोणताही विधी, सण, उत्सव साजरा करणे, इमारतीच्या भिंतीवर धार्मिक घोषवाक्य लिहिणे, धार्मिक फोटो लावणे, हे भारतीय संविधानानुसार निषिध्द व चुकीचे असल्याने ते ताबडतोब बंद करावे, धार्मिक फोटो सन्मानाने काढण्याबाबत...**

उपरोक्त विषयाबाबतचे शासनाचे पत्र क्रमांक संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१७९-१६/आस्था-२, दिनांक २३.१२.२०१६ सहपत्रांसह सोबत जोडत आहे.

वरील पत्राच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभाग दिनांक २१.११.२०१६ रोजीच्या पत्राची प्रत व श्री. संग्राम सावंत, राज्य संघटक, सेक्युलर मुव्हमेंट, कोल्हापूर यांनी मा. मुख्यमंत्री महोदय (महाराष्ट्र राज्य) यांना लिहिलेल्या दिनांक २४.८.२०१६ रोजीच्या निवेदनामध्ये नमूद करण्यात आलेल्या मागण्यांबाबत तात्काळ कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल या संचालनालयास पाठवावा जेणेकरून शासनास सादर करणे शक्य होईल.

( सुचित्रा रणदिवे )
सहाय्यक संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी :-**
१) सर्व कार्यासने, मुख्य कार्यालय, मुंबई यांना तात्काळ कार्यवाहीसाठी सादर.

पृ.क्र.विकाऔ/भांडार/२०१७/ १८६४
दिनांक 25 MAY 2017

प्रति,
प्राचार्य/संचालक,
शासकीय / अशासकीय अनुदानित तंत्रनिकेतने / अभियांत्रिकी /
औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये,
औरंगाबाद विभाग.

यांना प्रत देवून कळविण्यात येते की, उपरोक्त विषयी केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल तात्काळ संचालनालयास सादर करण्यात यावा.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत — प्रोग्रॅमर यांना कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र.०२२ २२८५५७६६

क्र : संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१७९-१६/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा रोड,
४३१ (विस्तार),४ था मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २३.१२.२०१६

उच्चशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
शा: २९३६८
30/12/2016
१६

प्रति,

संचालक, ( उच्चशिक्षण / तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालय ), महाराष्ट्र राज्य.
कुलगुरु, सर्व अकृषिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
उपसचिव ( महाविद्यालयीन शिक्षण / विद्यापीठ /तंत्रशिक्षण / कला / ग्रंथालये ),
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.

विषय : शासकीय / निमशासकीय कार्यालये (विभागीय/जिल्हा व तालुका स्तर) शासन संचालित शैक्षणिक संस्थांमध्ये कोणताही विधी, सण, उत्सव साजरा करणे, इमारतीच्या भिंतीवर धार्मिक घोषवाक्य लिहिणे, धार्मिक फोटो लावणे, हे भारतीय संविधानानुसार निषिद्ध व चुकीचे असल्याने ते ताबडतोब बंद करावे, धार्मिक फोटो सन्मानाने काढण्याबाबत...

सामान्य प्रशासन विभाग दिनांक २१.११.२०१६ रोजीच्या पत्राची प्रत व श्री. संग्राम सावंत, राज्य संघटक,सेक्युलर मुव्हमेंट, कोल्हापूर यांनी मा.मुख्यमंत्री महोदय (महाराष्ट्र राज्य) यांना लिहिलेल्या दि.२४.८.२०१६ रोजीच्या निवेदनाची प्रत सोबत जोडली आहे.

सदर पत्रात नमूद केलेल्या व आपल्या उपविभागाशी / कार्यासनाशी संबंधीत असलेल्या मागण्याबाबत कृपया तात्काळ कार्यवाही करावी व केलेल्या / करण्यात येत असलेल्या कार्यवाहीबाबत अर्जदारास परस्पर कळविण्यात यावे. तसेच या कार्यासनासही अवगत करण्यात यावे, ही विनंती.

(रा.वि.जाधव)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

(३)

प्रत:

श्री. संग्राम सावंत, राज्य संघटक,सेक्युलर मुव्हमेंट, मु. मसोली, पो.आजरा, जि. कोल्हापूर-४१६ ५०५.

5656
25.11.16

दूरध्वनी क्र. (022) 2279 3655
Email : gad_18 @ maharashtra.gov.in
Website : maharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), कक्ष क्र. 631, मुंबई- ४०००३२.

सूचना का अधिकार
RIGHT TO INFORMAT

28 NOV 2016

क्रमांक : संकीर्ण २०१६/प्र. क्र.१७२/१८ (र. व का.)

दिनांक:- २१ नोव्हेंबर, २०१६

प्रति,

सह /उप सचिव ,
शालेय शिक्षण विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.

विषय :- शासकीय / निमशासकीय कार्यालये ( विभागीय/जिल्हा व तालुका स्तर) शासन संचलित शैक्षणिक संस्थांमध्ये कोणताही विधी, सण, उत्सव साजरा करणे, इमारतींच्या भिंतीवर धार्मिक घोषवाक्य लिहीणे, धार्मिक फोटो लावणे, हे भारतीय संविधानानुसार निषिध्द व चुकीचे असल्याने ते ताबडतोब बंद करावे, धार्मिक फोटो सन्मानाने काढण्याबाबत

महोदय,

श्री.संग्राम सावंत,कोल्हापूर यांनी मा.मुख्यमंत्री यांना लिहीलेल्या दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ च्या निवेदनाची प्रत सोबत पाठवित आहे. आपणास विनंती करण्यात येते की, सदरहू पत्रातील आपल्या विभागाशी संबंधित मुद्याबाबत कृपया उचित कार्यवाही करण्यात यावी.

सोबत:वरीलप्रमाणे

आपला

-सही-

(रा.भा.गायकवाड)
कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग

प्रत,

१. सह /उप सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.

त्यांना विनंती करण्यात येते की, अर्जदाराने केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी योग्य ती कार्यवाही करुन त्याबाबत अर्जदारास परस्पर कळविण्यात यावे.

(रा.भा.गायकवाड)
कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग

प्रत,माहितीस्तव अग्रेषित:-

श्री.संग्राम सावंत, राज्य संघटक, सेक्युलर मुव्हमेंट, मु.मरोली. पो.आजरा, जि.कोल्हापूर-४१६५०५.

२७८

३/५

# सेक्युलर मुव्हमेंट

**मुख्य कार्यालय** गौतमीपुत्र कांबळे - ३३, अव्याकृत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गृहनिर्माण संस्था, विजयनगर (पूर्व), वान्लेसवाडी, सांगली ४१६४१४ मो.: ९८२२९७५४३०

**पत्र व्यवहाराचा पत्ता** संग्राम सावंत (राज्यसंघटक) मु. मसोली, पो. आजरा, ता. आजरा, जि. कोल्हापूर ४१६५०५

| प्रा. जे. व्ही. सरतापे सर (जिल्हा संघटक) | अजय देशमुख (जिल्हा संघटक) | रवी भोसले (संघटक) |
|---|---|---|
| केडीसीसी बँक कॉलनी, वडरगे रोड, गडहिंग्लज ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर मो.: ९४२२२७१०१५ | मु. पो. देवडे ता. आजरा, जि. कोल्हापूर मो.: ९८२३७४०६७२ | दसरा चौक, आजरा रोड, नेसरी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर मो.: ९७६५६७२६७१ |

**मुख्य संघटक**
* गौतमीपुत्र कांबळे (सांगली)
* जयंत भालेराव (नाशिक)
* प्रा. डॉ. भरत नाईक (कोल्हापूर)
* अशोक गायकवाड (औरंगाबाद)
* प्रा. सचिन गरुड (इस्लामपूर)
* प्रसेनजित बनसोडे (सांगली)

**महाराष्ट्र संघटक**
* संग्राम सावंत (आजरा)
* गौतम सांगळे (मुंबई)
* प्रा. साहेबराव नितनवरे (सांगली)
* आकाश साबळे (पुणे)
* भारती ठवळे (उस्मानाबाद)
* अवंती कवाळे (कोल्हापूर)

दिनांक : २४/०९/२०१६

प्रति,
मा. देवेंद्र फडणवीस,
मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन
मुंबई - ३२

मुख्यमंत्री सचिवालय 1862995 27 SEP 2016

सा.प्र.वि.

**विषय :-** शासकिय / निमशासकीय कार्यालये (विभागीय/जिल्हास्तर व तालुकास्तरावरील) शासन संचलित शैक्षणिक संस्था यामध्ये कोणत्याही धर्माच्या धार्मिक विधी,सण, उत्सव, इमारतींच्या भिंतीवर धार्मिक घोष वाक्ये लिहिणे, धार्मिक फोटो लावणे हे भारतीय संविधानानुसार निषिध्द व चूकीचे आहे. ते तात्काळ बंद करावे, धार्मिक फोटो सन्मानाने काढणेबाबत.......

महोदय,

'सेक्युलर' मुव्हमेंट ही लोकशाही, घटनेची मुलभूत तत्वे, न्याय, स्वातंत्र्य, समता,बंधुत्व, विवेक व वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार व प्रसार करते. भारताच्या घटनेने निधर्मी प्रशासनाची ग्वाही दिलेली आहे. त्यामुळे भारतीय शासनव्यवस्था व प्रशासन यांच्याकडून निधर्मी सेवा देणे अंतर्भूत आहे.

असे असले तरी, सर्व प्रशासकीय, शासकीय संस्थामध्ये या तत्वाची अंमलबजावणी न होता त्यांची पायमल्ली होते आहे.अनेक शासनसंस्था विभागात, धार्मिक पूजा, व साग्रसंगीत धार्मिक कार्यक्रम केले जातात. धर्म आचरणाचे स्वातंत्र्य आम्हांस मान्य आहे. मात्र धर्म व जात यांचे आचरण ही खाजगी बाब आहे. ती सार्वजनिक व प्रशासन - शासन यातून व्यक्त करणे घटना विरोधी आहे.

वरील विषयास अनुसरुन भारतीय संविधानानुसार भारत हे धर्मनिरपेक्षता (कोणत्याही एका धर्माचे राष्ट्र नाही) म्हणजेच सेक्युलर राष्ट्र म्हणून भूमिका घेऊन जगणारे राष्ट्र आहे. राज्य घटनेचा स्वीकार आपण, ता. २६ जानेवारी १९५० रोजी केला आहे. भारतीय संविधनाने धर्मनिरपेक्षतेचा

विचार प्रामुख्याने धर्मस्वातंत्र्य, धर्मसंस्था आणि शासन संस्था यांच्या परस्परसंबंधांचा केला असला तरी हा विचार मानवी कल्याण आणि सुधारणांच्या संदर्भात केला आहे. म्हणून घटनेच्या कलम २५

(१) नुसार आपापला किंवा आपल्या आवडीनुसार धर्माचे पालन करण्याचा या त्याचा प्रचार करण्याचा ही अधिकार दिला असला तरी तो सार्वजनिक सुव्यवस्था, नितिमत्ता व आरोग्य यांच्या अधिन राहून तो अधिकार उपभोगायचा आहे. धर्मस्वातंत्र्य आहे, अगदी आपापल्या धर्माचा प्रचार करण्याचेही स्वातंत्र्य आहे. पण सामाजिक व्यवस्था, आरोग्य आणि नितिमत्ता याला बाधा न आणू देता ते स्वातंत्र्य उपभोगाचे आहे.

भारतीय संविधानामध्ये असे म्हटले आहे की, मानवी कल्याण आणि सुधारणा करण्यासाठी कायदे करताना धर्माची पर्वा केली जाणार नाही. भारतीय राज्यघटनेच्या भाग ३ मध्ये कलम १२ ते ३५ पर्यंत मूलभूत अधिकारामध्ये धर्म स्वातंत्र्याचा अधिकार कलम २५ मध्ये दिला असला, तरी धर्मांधता निर्माण होणार नाही, याची दखल घेतली आहे. राज्यघटनेच्या भाग - १६ मध्ये ३३७, भाग १७ मध्ये कलम ३५० नुसार, धर्मनिरपेक्षता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच संघसूची मध्ये कलम ६३,६४,६५ व ६६ नूसार शिक्षण व्यवस्था अधिक विज्ञाननिष्ट व निधर्मीय करण्याचा प्रयत्न करण्यांसदर्भात सूचविले आहे. त्यानुसार शैक्षणिक संस्थांच्या शाळेत कोणत्याही धर्माच्या विधी, पुजा- अर्चा, फोटो लावण्यात येऊ नयेत.

**महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्र.-संकीर्ण १०/प्र.क्र.१३४/२००२/पं. स. - १ मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. ७ जून २००२ च्या परिपत्रकानुसार शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासन संचलित शैक्षणिक संस्था इ. मध्ये मान्यवर/राष्ट्रीय / राज्यस्तरीय नेत्यांची छायाचित्रे लावण्याबाबत सांगितले आहे.** मात्र त्याची अंमलबजावणी झालेली नाही असे दिसते आहे. तरी **याची अंमलबजावणी ताबडतोब व्हावी अशी** आमची मागणी आहे.

राज्यघटना कलम २८(१) - नूसार पूर्णतः राज्याच्या पैशातून चालविल्या जाणाऱ्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत कोणतेही धार्मिक शिक्षण दिले जाणार नाही. याची स्पष्ट व ठाम भूमिका

भारतीय संविधानाने घेतली आहे. त्यानुसार जर कोण वागत नसेल तर यांच्या वर दंडात्मक कार्यवाही करावी अशी आमची मागणी आहे. कोणताही ताणतणाव निर्माण होवू नये यासाठी कोणत्याही शासकीय /निमशासकीय कार्यालयामध्ये तसेच शासन संचलित शैक्षणिक संस्थेमध्ये कोणत्याही धर्माच्या विधी पूजा अर्चा, सण उत्सव साजरे होऊ नये तसेच कोणत्याही धर्माचे फोटो प्रतिके/प्रतिमा लावण्यात येऊ नयेत. जर अशा विधी, पुजा, अर्चा, सण उत्सव होत असतील तसेच धार्मिक फोटो लावलेले असतील तर आपल्या पुढाकाराने या सर्व गोष्टी बंद व्हाव्यात, तसेच सन्मानाने धार्मिक फोटो काढावेत कारण भारतीय संविधानानुसार भारत हे धर्मनिरपेक्ष म्हणजेच सेक्युलर राष्ट्र आहे. अशी ठाम व ठोसभूमिका भारतीय संविधानाने घेतली आहे हे आपणास ज्ञात आहे. शासकिय कार्यालयामध्ये विविध जाती धर्माचे लोक आपली सेवा बजावतात तसेच शैक्षणिक संस्थामध्ये अनेक जाती धर्मांची मुलीमुले शिक्षण घेत असतात त्यामुळेच अशा पुजा विधींना नाईलाजाने हजर राहण्याची परिस्थिती त्यांच्या वर येऊ शकते तेव्हा त्यांच्या भावनांचा आदर राखला जावू शकणार नाही. ही कार्यालये देशाच्या कचेऱ्या आहेत. या कचेऱ्या मध्ये न्याय निवाडा, मानवी कल्याणाच्या योजना राबविल्या जातात. हे करताना यामध्ये कोणत्याही धर्माचा हस्तक्षेप नसतो. या कचेऱ्या भारतीय संविधनानुसार चालणाऱ्या असाव्यात, तसेच शैक्षणिक संस्था मध्ये सुध्दा ही भूमिका राबविली जावी अशी आमची मागणी आहे.

आमच्या मागण्या :-

१) शिक्षण सर्व धर्मांच्या देव-देवतापासून आणि सर्व धर्मापासून मुक्त करावे.

२) कोणत्याही शासकीय/निमशासकीय कार्यालयात कोणत्याही धर्माच्या धार्मिक विधी, पुजा-अर्चा होता कामा नयेत.

३) शासन संचलित शैक्षणिक संस्थामध्ये धर्मनिरपेक्षतेचे म्हणजेच सेक्युलर व्हिजन असणारे शैक्षणिक कार्यक्रम घेण्यात यावेत.

४) कोणत्याही शासकीय / निमशासकीय कार्यालये तसेच शासन संचलित शैक्षणिक संस्थांमध्ये कोणत्याही धर्माचे फोटो लावण्यात येऊ नयेत

५) कोणत्याही शासकीय / निमशासकीय कार्यालये तसेच शासन संचलित शैक्षणिक संस्थांमध्ये कोणत्याही धर्माचे सण - उत्सव होता कामा नये.

वरील मागण्यांचा आपण गांभीर्यपूर्वक, वैज्ञानिक दृष्टिकोनातून आणि सेक्युलर पध्दतीने विचार करुन मागण्या प्रमाणे कृती व कार्यक्रम शासकीय/ निमशासकीय कार्यालय तसे शासन

संचलीत शैक्षणिक संस्था मध्ये होत असतील तर ते ताबडतोब बंद व्हावेत अशी आमची ठाम भुमिका आहेत. नाहीतर आम्हाला या मागण्यासाठी आंदोलन करावे लागेल. आंदोलन करण्याची वेळ आमच्यावर येऊ नये असे आमचे मत आहे. आपल्या सकारात्मक प्रतिसादाच्या प्रतिक्षेत आहोत!

प्रशासन व शासन व्यवस्था ही संविधानानुसार काम करणे बंधनकारक आहे. तसे असताना जर कोणत्याही धर्माच्या धार्मिक स्वरुपाचे कार्यक्रम, विधी व व्यवहार व प्रतिमा पूजन व पूजा-प्रार्थना इ. उपक्रम जर शासकिय कार्यालयात, जागेवर व आवारात केले जात असतील तर त्या संलग्न प्रशासकीय व शासकीय विभागांनी तसे करु नये याविषयी आपण योग्य ती कार्यवाही करावी अशी आमची आपणांस नम्र विनंती आहे.

**या संदर्भात आम्हास आपण योग्य तो प्रतिसाद ८ दिवसात द्याल या अपेक्षेत आहोत. नाहीतर आम्हाला वरील मागण्यासांसाठी आंदोलन करण्याची वेळ येईल.**

माहितीसाठी संदर्भ -

१. शासन निर्णय - दि. ७ जून २००२ महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्र.- संकीर्ण १०/प्र.क्र.१३४/२००२/पं.सं.१ मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
२. जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर
सामान्य प्रशासन शाखा यांचे सेक्यलर मुव्हमेंटला दिलेले पत्र - क्रं./साशा/संकीर्ण/कार्या ७/२३७५/२०१५ दि. ०८/०९/२०१५.
३. सांगली जिल्हा परिषद, सांगली
सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्रमांक साप्रवि/आस्था/११/२५९८/२०१५ दि. १६ नोव्हेंबर, २०१५ चे पत्र

आपले विश्वासू,

प्रा.डॉ. भरत नाईक
(मुख्य संघटक)

प्रा. गौतमपुत्र कांबळे
(मुख्य संघटक)

संग्राम सावंत
(राज्य संघटक)

अवंती कवाळे
(राज्य संघटक)

प्रा. डॉ. जे. डी. सरतापे
(जिल्हा संघटक)

अजयकुमार देशमुख
(जिल्हा संघटक)

नागपूर ठाणे